# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## राज्यातील वस्तीशाळा शिक्षकांची नियमित सेवेपूर्वीची मानधनावरील सेवा वरिष्ठ वेतनश्रेणी आणि सेवानिवृत्तीकरीता ग्राह्य धरण्याबाबत

**(१) ७२१ (२४-०४-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वस्तीशाळा शिक्षकांना त्यांच्या सेवा, शिक्षक पदी नियमित केल्या असून, शिक्षण सेवकांप्रमाणे, सेवा नियमित होण्यापूर्वी सदर वस्तीशाळा शिक्षकांना एकत्रित रकमेचे मानधन देण्यात येत होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण सेवक पदावरील सेवा, शिक्षकाच्या नियमित सेवेस जोडून वरीष्ठ वेतनश्रेणी, निवृत्ती वेतन इत्यादी लाभ त्यांना देण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण सेवकासमान नियमित सेवेपूर्वी मानधनावर सेवा देणाऱ्या वस्तीशाळा शिक्षकांची नियमित सेवेपूर्वीची मानधनावरील सेवा वरीष्ठ वेतनश्रेणी आणि सेवानिवृत्तीकरीता ग्राह्य धरण्याबाबत, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (११-१२-२०२५) :** (१), (२) व (३) यानुषंगाने शालेय शिक्षण शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०१४ मधील परिच्छेद क्र.७ मध्ये "सदर निमशिक्षकांना सेवेत सामावून घेतल्यानंतर/ त्यांना नियमित वेतनश्रेणी लागू केल्यानंतर त्यांना राज्य शासनाची "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू राहील" असे स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच सदर शासन निर्णयात स्पष्ट केल्यानुसार "सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून त्यांना प्राथमिक शिक्षकाची वेतनश्रेणी (वेतन बँड ५२०० - २०२०० ग्रेड वेतन २८००) देण्यात यावी" वरीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यांतर्गत एकात्मिक नदी जोड प्रकल्पांत पार गोदावरी एकात्मिक नदी जोड योजना राबविण्याबाबत

**(२) २४०९ (१८-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ, श्री.हेमंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९ ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पार -गोदावरी राज्यांतर्गत एकात्मिक नदी जोड प्रकल्पाचे तीन महिन्यांत सर्वेक्षण करण्याचे मा.मंत्री जलसंपदा यांनी जलविज्ञान विभागाला दिनांक ७ मार्च २०२५ रोजी वा त्या सुमारास निर्देश दिले असून पाणी टंचाईवर कायम स्वरुपी मात करण्यासाठी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरुन समुद्रात वाहून जाणारे पाणी तुटीच्या खोऱ्यात वळविण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी धोरणात्मक निर्णय घेतला असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदी जोड प्रकल्पाचे सर्वेक्षण पूर्ण झाले असल्यास या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन गोदावरी खोऱ्यात चार नदीजोड प्रकल्प योजना राबवून पाणी उपलब्ध केले जाणार असल्याने पार गोदावरी राज्यांतर्गत एकात्मिक नदी जोड योजना राबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०९-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

पार गोदावरी प्रकल्पामध्ये मूळ नियोजनानुसार पाण्याची तुट असल्याने पार गोदावरी प्रकल्पाद्वारे अधिकाधिक पाणी गोदावरी खोऱ्यात नेण्याच्या अनुषंगाने प्रकल्पाचे पुर्ननियोजन करणेबाबत मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचेकडील बैठकीत चर्चा झालेली आहे.

सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरुन समुद्रात वाहून जाणारे पाणी तुटीच्या खोऱ्यात वळविण्यासाठीच्या योजनांना मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) पार- गोदावरी नदीजोड योजना क्र ३ व ४ या योजनेचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून या दोन्ही योजनांचे सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) छाननीस्तव महामंडळ कार्यालयात सादर करण्यात आलेले होते. तथापि, सद्य:स्थितीत उपलब्ध पाण्याचे परिगणन करतांना पार गोदावरी नदीजोड योजना क्र.३ व ४ करीता मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांनी उपलब्ध करून दिलेल्या एकूण ८५.४१ द.ल.घ.मी. पाण्यामधून ४०.१५ द.ल.घ.मी. वजा करून उर्वरित ४५.११ द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध झाल्याचे जलविज्ञान नाशिक यांचे मार्फत दिनांक २७/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाचा अतिरिक्त पाण्याबाबतचा अभ्यास प्रगती पथावर असून अभ्यासाअंती पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संचमान्यतेबाबतच्या जाचक अटी रद्द करण्याबाबत

**(३) २४८४ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात शून्य शिक्षकी शाळा झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणार असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संच मान्यतेच्या सुधारीत निकषांचा शासन निर्णय रद्द करणे व त्यामध्ये बदल करणे या संदर्भात विविध संघटनांकडून शासन स्तरावर निवेदने प्राप्त झाली आहेत. सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण) यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संचमान्यतेतील विद्यार्थी संख्येचे निकष रद्द करण्याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करण्यात आले आहेत. त्यानंतर आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्याकडून प्राप्त प्रस्तावानुसार दिनांक १९/०९/२०२४ व दिनांक ०९/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्याध्यापक पदाबाबतच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सोयाबीन खरेदी करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्यासाठी समिती स्थापन करण्यात आल्याबाबत

**(४) ३४१५ (१८-०७-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीन खरेदीत अनियमितता झाल्यामुळे त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्याच्या धर्तीवर सोयाबीन खरेदी करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीमध्ये अध्यक्ष, सदस्य म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच सदरहू समितीमार्फत दिनांक १५ मे,२०२५ पर्यंत शासनास अहवाल सादर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीच्या अहवालात कोणकोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत, सदर अहवालाच्या शिफारशींच्या अनुषंगाने सोयाबीन खरेदीत अनियमितता करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (१८-१२-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीन खरेदीत अनियमितता झाल्यामुळे समिती नियुक्त केलेली नसून आधारभुत किंमत खरेदी अंतर्गत कडधान्य व तेलबिया खरेदीसाठी मध्यप्रदेश व छत्तीसगड या राज्यांतील शेतमाल साठवणूकीबावत तेथील वखार महामंडळांमार्फत वांधण्यात आलेल्या गोदामांतील सुविधा व त्यांचा दर्जा यांचा अभ्यास करून, राज्याच्या खरेदी प्रक्रियेच्या अनुषंगाने योग्य ते नियोजन करण्याबाबत शिफारस करण्यासाठी शासनाने दिनांक १५/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आली होती.

(२) सदर गठीत समितीमधील नियुक्ती केलेले अध्यक्ष व सदस्य खालीलप्रमाणे:-

१) श्री.कौस्तुभ दिवेगावकर (भाप्रसे), अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे- अध्यक्ष

२) श्री.दिपक तावरे (भाप्रसे), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे- सदस्य

३) श्री.श्रीधर डुवे पाटील (भाप्रसे), व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई - सदस्य,

४) श्री.विकास रसाळ, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - सदस्य

५) श्री.संजय कदम, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे - सदस्य

६) श्री.महेंद्र ढेकाणे, प्रबंधक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई - सदस्य सचिव

सदर गठीत केलेल्या समितीने मध्यप्रदेश व छत्तीसगड येथे प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांचा अहवाल दिनांक ०४/०७/२०२५ रोजी शासनास प्राप्त झाला आहे.

(३) सदर अहवालात खरेदी प्रक्रीया राबविण्यासंदर्भात काही ठळक शिफारशी खालीलप्रमाणे आहेत:-

I.खरेदी संबंधी राज्यस्तरावर सुकाणू समिती, जिल्हास्तरीय समिती असावी. सदर समितींमार्फत खरेदी प्रक्रीयेवर नियंत्रण असावे.

II.शेतकरी नोंदणी आधार क्रमांक लिंक असावी.

III.शेतमालाचा दर्जा तपासणीसाठी खरेदी केंद्रावर सर्वेअर नियुक्त करावे.

तसेच खरेदी प्रक्रीयेशी संबंधित आवश्यक बाबींसंदर्भात विविध शिफारशी करण्यात आल्या आहेत.

राज्याच्या खरेदी प्रक्रियेच्या अनुषंगाने योग्य ते नियोजन करण्याबाबत शिफारस करण्यासाठी सदर समिती गठित करण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या (चिमटा धरण) विस्तारीकरणासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या भूसंपादित झालेल्या जमिनींचा योग्य मोबदला मिळण्याबाबत

**(५) ३६२४ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील बहुचर्चित निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या (चिमटा धरण) विस्तारीकरणासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनींचे सन २००८ ते २०१० मध्ये वाटाघाटीने भूसंपादन

करण्यात आले असून शेतकऱ्यांना योग्य मोबदला न मिळाल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून वाढीव मोबदल्याची मागणी शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण झाल्यावरही विविध कारणांमुळे प्रकल्पनिर्मितीचे काम सुरु न झाल्यामुळे गेल्या १४ वर्षापासून अधिग्रहित जमीन विनावापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या मागणीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये जलसंपदा विभागाकडून वाढीव मोबदला वितरीत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आतापर्यंत किती प्रकल्पग्रस्तांना वाढीव मोबदला वितरीत करण्यात आला आहे व उर्वरीत प्रकल्पग्रस्तांना केंव्हापर्यंत वाढीव मोबदला मिळणे अपेक्षित आहे,तसेच सदर प्रकल्पाच्या कामास केव्हापासून सुरुवात होणार आहे व प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे ?

**श्री.गिरीश महाजन (२४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

निम्न पैनगंगा प्रकल्प विभागाने प्रकल्पाच्या धरण रेषेवरील व बुडीत क्षेत्रातील मौजे खडका, ता.आर्णी, जि.यवतमाळ, मौजे खंबाळा व मौजे टेंभी (तांडा), ता.किनवट, जि.नांदेड येथील ७६९.९५ हेक्टर खाजगी जमीन सरळ वाटाघाटीने संपादित केली आहे.
तसेच विदर्भ बळीराजा चेतना संघर्ष समितीने वाढीव मोबदला मिळण्यासाठी आंदोलन केले असून, शासनाकडे वारवांर मागणी केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

माहे जून-२०११ मध्ये धरणाच्या प्राथमिक कामास सुरुवात करण्यात आलेली होती. दिनांक ०७/०५/२०१२ रोजी धरण विरोधी संघर्ष समितीने व स्थानिक लोक प्रतिनिधीनी काम करण्यास विरोध करुन काम बंद पाडले. त्यानंतर सदर निविदा रद्द करण्यात आली.

सदर प्रकल्पाची तपासणी सन २०१४ पासून राज्यस्तरीय सिंचन विषयक विशेष चौकशी समिती मार्फत करण्यात आली व त्यांच्या अहवालावर महाराष्ट्र शासनाचे दिनांक २३/०५/२०२२ च्या पत्रान्वये प्रकल्प दोषमुक्त करण्यात आला आहे. प्रथम टप्प्यातील मुख्य धरण कामाची निविदा कार्यवाही पूर्ण करून कार्यारंभ आदेश दिनांक ०५/०२/२०२४ अन्वये देण्यात आले आहे व धरणाचे काम व प्रथम टप्प्यातील भूसंपादन व पुनर्वसन कामे प्रगतीप्रथावर आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सरळ वाटाघाटीने मौजे खडका येथील १२५ भूधारकांपैकी ८०, मौजे खंबाळा येथील २०४ भूधारकांपैकी ७४, मौजे टेंभी तांडा येथील ३४ भूधारकांपैकी २४ भुधारकांना मोबदला शासनाकडून मंजूर ५ लक्ष प्रती हेक्टर सानुग्रह अनुदान वितरित करण्यात आले आहे. उर्वरित वितरणाची कार्यवाही सुरू असून, मयत भूधारकांच्या वारसांची कायदेशीर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मोबदला वितरित करण्यात येणार आहे.
प्रथम टप्प्यातील मुख्य धरणाचे कामास दिनांक ०५/०२/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून काम प्रगती पथावर आहे. प्रकल्पाचा प्रथम टप्पा २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत असलेल्या चार मोठे प्रकल्पांच्या कालवा सल्लागार समितीअंतर्गत झालेल्या बैठकीबाबत

**(६) ४३९७ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प, विष्णुपुरी प्रकल्प, पूर्णा प्रकल्प कालवा सल्लागार समितीची मा.जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर येथ◌ो दिनांक १ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यात आली आहे काय वा याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

कालवा सल्लागार समितीची दिनांक २८/०२/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली आहे.

(२) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत असलेल्या चार मोठे प्रकल्प उर्ध्व पेनगंगा प्रकल्प, विष्णुपुरी प्रकल्प,निम्न मानार प्रकल्प व पुर्णा प्रकल्प (येलदरी व सिद्धेश्वर) या प्रकल्पांची दिनांक १५/१०/२०२४ रोजीच्या पाणीसाठ्यावर आधारीत रब्बी व उन्हाळी हंगामाच्या पाणी नियोजनास दिं. २८/०२/२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

तसेच बैठकीत

i) उन्हाळयामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी व जनावरांना पिण्याकरीता नदीपात्रात पाणी सोडणे

ii) कालव्याच्या दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी मिळणे बाबत

iii) पाटबंधारे विभागाच्या जुन्या इमारती, वसाहती, रेस्ट हाऊस, मोकळया जागा ह्या कोर्ट, हॉस्पिटल यांना देणे बाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेणे,

iv) पूर्णा प्रकल्पांतर्गत असलेल्या सिध्देश्वर धरणावरुन सिध्देश्वर उपसा सिंचन योजना व केळी पाझर तलावाच्या योजनेबाबत.

v) पूर्णा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातुन वाहणाऱ्या कयाधु नदीद्वारे सेनगाव तालुका व हिंगोली तालुका जोडून अनुशेष दूर करणेबाबत, ह्या प्रमुख मागण्याच्या अनुषंगाने चर्चा होऊन मा.मंत्री महोदयांनी आवश्यक निर्देश दिले.

(३) होय. मा.मंत्री महोदयांनी बैठकीत दिलेल्या उपरोक्त उप प्रश्न २ मध्ये नमूद निर्देशाच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## राष्ट्रीय साधन-सह गुणवत्ता शिष्यवृत्ती (NMMS) योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरित करण्याबाबत

**(७) ५५६८ (२१-११-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय साधन-सह-गुणवत्ता शिष्यवृत्ती (NMMS) योजना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत राबविण्यात येते तसेच या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावी पर्यंत प्रतीवर्षी १२,००० रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिक्षेद्वारे सन २०२२ - २३ मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी रक्कम थकीत असून अद्यापही वितरित करण्यात आली नसून या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी व वितरणाची प्रक्रिया विलंबाने पार पडल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा व पालकांचे आर्थिक नियोजन विस्कळीत झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिष्यवृत्ती वितरणात झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत, तसेच उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने पुढील काळात शिष्यवृत्ती वितरणाची प्रक्रिया सुरळीत व वेळेत पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१)हे अंशतः खरे आहे,

सदर योजना ही केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली राबवित असताना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत परीक्षा घेण्यात येते, तसेच शिष्यवृत्ती वितरणबाबतची कार्यवाही ही शिक्षण संचालनालय योजना महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत करण्यात येते, याबाबत वेळोवळी केंद्र शासन परिपत्रक निर्गमित करते. दिनांक १५/०३/२०२२ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(८) ५६०६ (२१-११-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात आदर्श मॉडेल स्कूलसारखे यशस्वी उपक्रम राबविण्यात येत असून, जिल्हा परिषदेमार्फत कार्यरत असलेल्या सुमारे ३,२५९ शाळांमध्ये अंदाजे २.५० लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी नाशिक जिल्ह्यातील उपरोक्त शाळांमधील सुमारे ८०३ वर्गखोल्या नादुरुस्त अवस्थेत असूनही त्यांची कोणतीही दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याची बाब यू-डायस प्रणालीवरील माहितीच्या आधारे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा नियोजन समितीच्या एकूण अर्थसंकल्पातील ५ टक्के निधी शिक्षण विभागासाठी राखीव ठेवण्याची तरतूद असताना, जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्ती व नव्या वर्गखोल्यांच्या

बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीकडून केवळ सुमारे रु.११ लाख एवढाच निधी उपलब्ध होत असून तो अत्यंत अपुरा असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपुऱ्या निधीअभावी नादुरुस्त वर्गखोल्यांची दुरुस्ती होऊ न शकल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू वर्गखोल्यांच्या दुरुस्तीकरीता आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देणे, दुरुस्ती व पुनर्बांधणी कामे त्वरित सुरू करणे, आणि पावसाळी/ आपत्कालीन सुरक्षा उपाययोजना राबविणे या बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच या वर्गखोल्यांची दुरूस्ती किती कालावधीत करण्यात येणार असून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून शैक्षणिक कारणांकरीता ५ टक्क्यापेक्षा अधिक निधी राखीव ठेवण्याच्या अनुषंगाने किंवा अन्य माध्यमातून शैक्षणिक कारणांकरीता अधिक निधीची तरतूद करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे
(२) सन २०२५-२६ या वर्षात ६४ नवीन वर्गखोली बांधकाम मंजूर करण्यात आली असून त्याकरीता ७०४.०० लक्ष एवढा निधीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच १९५ शाळांता दुरूस्ती मंजूर असून त्याकरीता ९५१.५० लक्ष एवढ्या निधीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) शाळांच्या मूलभूत सोयी-सुविधांकरीता आवश्यकतेनुसार जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्यान,आदिवासी विकास विभाग, सिएसआर, गौणखणिज,लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग, इ.माध्यमांतूनही निधीची तरतूद दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सुचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासकीय मान्यतेविना परदेशी विद्यापीठे अथवा शैक्षणिक संस्थांकडून अभ्यासक्रम राबविण्यात येत असल्याबाबत

**(९) ५६११ (२१-११-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काही परदेशी विद्यापीठे अथवा शैक्षणिक संस्था (‘Foreign Universities’) महाराष्ट्रात किंवा देशात कोणतीही शासकीय मान्यता नसताना ‘डिग्री’, ‘डिप्लोमा’ किंवा ‘सर्टिफिकेट कोर्स’ अशा स्वरूपाचे अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांची फसवणूक करीत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने किंवा संबंधित नियामक मंडळांनी (उदा. UGC, AICTE, DTE इ.) अशा शैक्षणिक संस्था, विद्यापीठांविरुध्द कोणत्या पातळीवर चौकशी अथवा कारवाई सुरू केली आहे काय, असल्यास त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, बेकायदेशीर संस्थांकडून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित

ठेवण्यासाठी तसेच शासनाच्या परवानगीशिवाय कार्यरत असलेल्या परदेशी संस्थांची नावे व त्यांची कार्यक्षेत्रे जाहीर करून, राज्यातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देवून त्यांचे शैक्षणिक भवितव्य सुरक्षित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये परदेशी विद्यापीठांच्या संलग्नतेचे (affiliation) खोटे दावे करणाऱ्या संस्थांवर फौजदारी कारवाई करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही, अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये परदेशी विद्यापीठांच्या संलग्नतेचे (affiliation) खोटे दावे करणाऱ्या संस्थांवर महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ नुसार कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात घसरण झाल्याबाबत

**(१०) ५६३९ (२१-११-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा वर्ष २०२२, २०२३ आणि २०२४ या तीन वर्षांतील राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यातील (NIRF Ranking) क्रमांक व प्रत्येक निकषानुसार मिळालेले गुण लक्षात घेता या विद्यापीठाची राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारीत सातत्याने घसरण होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विद्यापीठाची राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारीत झालेल्या घसरणीची प्रमुख कारणे कोणती आहेत त्यानुषंगाने या प्रकरणी शासनाने चौकशी अथवा तपासणी केली आहे काय,
(३) असल्यास, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील संशोधनाच्या पातळीवर, प्रयोगशाळा सुसज्जतेवर आणि शिक्षक प्रशिक्षणावर शासनाच्या अनुदानातून कोणती प्रगती घडवून आणली आहे,
(४) असल्यास, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच "उच्च शिक्षण गुणवत्ता वृद्धी अभियान" किंवा तत्सम कोणती धोरणात्मक योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)असल्यास, राज्यातील विद्यापीठांच्या 'रिसर्च आउटपुट', 'इनोव्हेशन इंडेक्स' आणि 'इंडस्ट्री कोलॅबोरेशन' वाढविण्यासाठी शासनाने काही उपाययोजना वा कृती आराखडा तयार केला आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) NIRF क्रमवारीकरीता वापरल्या जाणाऱ्या परिमाणांनुसार विद्यापीठाच्या विविध क्षेत्रांतील कामगिरीचे मूल्यमापन झाले आहे. त्यामध्ये अध्यापन-शिक्षण, संशोधन व पेटंट, प्रकल्प निधी तसेच Perception या निकषांमध्ये विद्यापीठाला अपेक्षित गुण मिळू शकले नाहीत.

(३) संशोधन आणि नवोपक्रम या घटकांतर्गत सहा विविध केंद्रे (Centers) स्थापन करण्यात आली आहेत. या संशोधन केंद्रांमधून मिळालेल्या निष्कर्षांमध्ये ५०० हून अधिक पीअर-रिव्यू केलेले संशोधन प्रकाशन, ७२ औद्योगिक भागीदारी, १५ बौद्धिक संपदा हक्क (IPR) आणि ७ औद्योगिक सल्लागार प्रकल्प (industrial consultancy projects) यांचा समावेश आहे. क्षमता विकास या घटकांतर्गत ४ केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या केंद्रांनी ५६ हून अधिक स्टार्ट-अप्स तयार केले आहेत आणि कॅम्पसमधील विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढवली आहे. सुधार आणि नूतनीकरण या घटकांतर्गत कॅन्टीन आणि ॲस्ट्रो-टर्फ हॉकी सुविधा यासोबतच दोन स्टुडिओ निर्माण केले आहेत. शासनाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान (RGSTC) आयोगामार्फत दिल्या गेलेल्या अनुदानामुळे अन्नकचऱ्याचे मूल्यवर्धन तसेच, किनारपट्टीवरील चक्रीवादळांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याचे मूल्यांकन यांसारख्या विविध क्षेत्रांतील संशोधकांना समाजकल्याण, पर्यावरणीय शाश्वतता आणि प्रादेशिक विकासाला थेट हातभार लावणारे संशोधन करण्याची संधी मिळाली आहे. निधीमुळे आवश्यक सुविधा उपलब्ध झाल्या, संशोधन क्षमता मजबूत झाली.

(४) राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठांतील विविध विभागांकडून संशोधनाला चालना देणे, उपलब्ध संसाधनांचा पुरेपूर कार्यक्षम वापर करणे, कार्यपध्दतीत पारदर्शकता आणि जबाबदारी आणणे व एक स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे याकरीता शासन निर्णय, दिनांक २२/०४/२०२५ अन्वये University Department Ranking Framework (UDRF) ची अंमलबजावणी सुरू केली आहे. या उपक्रमामुळे विभागांच्या संशोधन कार्यात, प्रकल्प निधी मिळवण्यात आणि पेटंट नोंदणीमध्ये लक्षणीय सुधारणा अपेक्षित आहे

(५) राज्यातील विद्यापीठांमधील संशोधन उत्पादन, नवोन्मेष निर्देशांक आणि उद्योग-सहकार्य वाढविण्यासाठी शासनाने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत पदव्युत्तर स्तरावर फील्ड प्रोजेक्ट्स, इंटर्नशिप्स, रिसर्च प्रोजेक्ट्स तसेच ऑन-द-जॉब ट्रेनिंग यांचा समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव वाढून संशोधनाभिमुखता, उद्योजकता आणि नवोन्मेष क्षमतांचा विकास होण्यास मदत होते. तसेच, उद्योग-संस्थांशी सहकार्य वाढवून संयुक्त संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि कौशल्याधारित प्रकल्पांना चालना मिळत आहे

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जलसंपदा विभागामार्फत धरण परिसरातील जमीनी, सार्वजनिक - खासगी भागिदारी (PPP) तत्वावर खासगी संस्थांना देण्याच्या निर्णयाबाबत

**(११) ५६६८ (२१-११-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने जलसंपदा विभागामार्फत धरण क्षेत्रातील जागांचा वापराबाबत घेतलेल्या नवीन निर्णयानुसार जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील २० धरण क्षेत्राच्या नजीकच्या अतिरीक्त जमीनी, विश्रामगृहे, रिक्त वसाहती आणि मोक्याच्या जमिनी "सार्वजनिक-खासगी भागीदारी" (PPP) तत्वावर खाजगी व्यावसायिक व कंपन्यांकडून विकसित करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्वीची पर्यटन स्थळांच्या प्रकारानुसार कराराची १० वर्षापासून ३० वर्षापर्यंतच असलेली कालमर्यादा वाढवून नवीन निर्णयानुसार पर्यटनाच्या नावाखाली जवळपास २० धरणाजवळील जमीनी ४९ वर्षांसाठी खाजगी संस्थांच्या ताब्यात दिल्या जाणार असून धरणाच्या मुख्य भिंतीपासून ३०० मीटरपर्यंतच्या परिसरात पर्यटकांना प्रवेश दिला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने धरणकाठावरील जागांचा 'खाजगी विकास' करण्याचा निर्णय कोणत्या उद्देशाने घेतला आहे या निर्णयामुळे धरणांच्या सुरक्षा तसेच या धरणातील पाण्याचा उपयोग करणाऱ्या नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता असून या भागात व धरण परिसरातील पर्यटन क्षेत्रात सर्रासपणे अवैधरित्या मद्यविक्री व मद्यसेवन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धरण परिसरातील या जमिनी पूर्वी पर्यटन,जलसंपदा अथवा सार्वजनिक उद्देशासाठी राखून ठेवण्यात आल्या होत्या,या जमिनींचे खासगी हस्तांतरण केल्यास पर्यावरणीय व सुरक्षेचे परिणाम तपासण्यात आले आहेत काय, सदर निर्णय रद्द करण्याबाबत तसेच असा अविचारी निर्णय घेणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासन कोणती कारवाई केली तसेच अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कायवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत ?
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०५-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

जलसंपदा विभाग शासन निर्णय, दिनांक १७/०६/२०१९ नुसार जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील धरण क्षेत्राच्या नजीकच्या अतिरिक्त जमिनी, विश्रामगृहे व रिक्त वसाहती "सार्वजनिक-खासगी भागीदारी" (PPP) या तत्वावर खाजगी यंत्रणांकडून विकसित करणे व व्यवस्थापन करणे यासाठीचे धोरण निश्चित करण्यात आले असून सदर धोरण हे जलसंपदा विभागातील सर्व धरण क्षेत्रांकरीता लागू आहे.

सदर शासन निर्णयामध्ये २० धरण क्षेत्रांचा उल्लेख नाही.

(२) अंशतः खरे आहे.

जलसंपदा विभाग शासन शुध्दीपत्रक, दिनांक ०८/१०/२०२५ नुसार दिनांक १७/०६/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील अ, ब, क प्रकारातील पर्यटन स्थळांकरीताच्या अनुक्रमे १० वर्षे, ३० वर्षे व ३० वर्षे कालावधीऐवजी सर्व तिन्ही प्रकारातील पर्यटन स्थळांकरीता ४९ वर्षे इतका कालावधी कराराकरीता निश्चित करण्यात आला आहे. सदर शुध्दीपत्रक देखील जलसंपदा विभागातील सर्व धरण क्षेत्रांकरीता लागू आहे. पर्यटकांच्या प्रवेशाकरीता निश्चित केलेले ३०० मी. अंतर हे धरण भिंतीपासून जलाशयाच्या बाजूकडील नौकानयन व जलक्रिडा याकरीताचे कमीत कमी अंतर आहे. प्रत्येक धरणाच्या ठिकाणी धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर अंतरात वाढ होऊ शकते.

(३) हे खरे नाही.

सदर धोरणाचा मुख्य उद्देश धरण व जलाशय परिसरातील अतिरिक्त शासकीय जमिनी पर्यावरणपूरक तसेच पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करून जलसंपदा विभागाच्या महामंडळाकडे असणाऱ्या मालमत्तांचा योग्य विनियोग करुन महामंडळाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे हा आहे.
(४) जलसंपदा विभाग शासन निर्णय, दिनांक १७/०६/२०१९ नुसार सदर धोरणास धरण सुरक्षितता विषयक शासन निर्णय, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम-१९७६, महाराष्ट्र जलक्षेत्र नियमन प्राधिकरण अधिनियम-२००५, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील नियम, हॉटेल्स बाबतचे नियम, संरक्षण कायदेबाबतचे नियम इत्यादी अनुषंगिक तरतूदी लागू आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त शाळांच्या दुरुस्ती व पुनर्वसनाबाबत

**(१२) ५६७४ (२१-११-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीच्या पुरामुळे जिल्हा परिषदेच्या एकूण २,७२७ शाळांपैकी ४३१ शाळांमध्ये पुराचे पाणी शिरले असून, या शाळांमधील शालेय पोषण आहार, शैक्षणिक साहित्य, ई रेकॉर्ड, संगणक आदी शैक्षणिक साधने वाहून गेली आहेत, तसेच अनेक ठिकाणी शाळांच्या इमारती, वर्गखोल्या, फर्निचर, वाचनालये आणि संगणक साहित्याचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील या पुरग्रस्त ४३१ शाळांतील शैक्षणिक साहित्य,फर्निचर व इमारतींच्या दुरुस्तीकरीता शासनाने किती निधी मंजूर केला आहे,
(३) असल्यास, संबंधित शाळांचे दुरुस्ती व पुनर्वसन कार्य जलद गतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) पुरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक पाहणीसाठी सोलापूर जिल्ह्यात आलेले असताना पुरस्थितीमळे झालेल्या नुकसानीची माहिती पथकास देण्यात आलेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील एकूण ३४७ शाळांचे इमारतीचे नुकसान झाले असून शाळांच्या दुरूस्तीसाठी रुपये १८५५.०८ लक्ष इतक्या निधीची मागणी केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी यांना किमान वेतन लागू करुन ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(१३) ५६८७ (२४-११-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, श्री.संजय केणेकर, श्री.योगेश टिळेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ११ हजार १५० सार्वजनिक ग्रंथालयांतील सुमारे २० हजार ३२१ कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत कमी मानधनावर कार्यरत आहेत. ग्रंथालय कायद्याला ५८ वर्षे पूर्ण झाली असतानाही या कर्मचाऱ्यांना शासनाकडून किमान वेतन लागू करण्यात आलेले नसल्याने कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहापुरतेही वेतन शासनाकडून मिळत नसल्याने शासनाने ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्याची मागणी ग्रंथालय कर्मचारी संघटना करत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिवाळी अधिवेशनात ग्रंथालयांना ४० टक्के अनुदान वाढीची घोषणा करण्यात आली परंतु या अनुदानवाढीचा शासकीय अध्यादेश अद्याप जारी करण्यात आला नसल्याने राज्यभरातील ग्रंथालय अनुदानाच्या प्रतीक्षेत असून या ग्रंथालयांच्या संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, तसेच शासनातर्फे ग्रंथालयांना मिळणाऱ्या अनुदानातून ५० टक्के रक्कम वेतनासाठी आणि ५० टक्के रक्कम वेतनेत्तर खर्चासाठी तरतूद असल्याने ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना देण्यांत येणारे वेतन रक्कम अतिशय कमी असल्याने कर्मचाऱ्यांनी गोवा, केरळ आणि कर्नाटक सरकार ग्रंथालय कर्मचाऱ्यांना २५ हजार रुपये किमान वेतन देतात त्याच धर्तीवर राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वेतन मिळावे ही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१० मध्ये ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधासंबंधी काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी अद्यापही का करण्यात आलेली नाही, याची कारणमीमांसा काय, या कर्मचाऱ्यांना किमान वेतनाचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती ठराविक कालमर्यादा निश्चित केली आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील ग्रंथालयांचे अनुदान वाढीची घोषणा पूर्ण करण्याच्या दृष्टीने व वेतनवाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०८-१२-२०२५) :** (१) व (२) व (३) राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना किमान वेतन व इतर अन्य मागण्यांसाठी मोर्चा/आंदोलन करण्यासंदर्भात ग्रंथालय कर्मचारी संघटनेकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

आजमितीस राज्यात १११५५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ व त्या अंतर्गत महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० नुसार सार्वजनिक ग्रंथालयांना परिरक्षण अनुदान दिले जाते. शासन निर्णय दिनांक २३/१२/१९९४ अन्वये ग्रंथालयांना मिळणाऱ्या परिरक्षण अनुदानातून ५० टक्के रक्कम ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च करण्यात येते.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची व्यवस्था त्यांच्या विश्वस्तांकडून पाहिली जाते. कर्मचारी नियुक्ती, त्यांचे वेतन व तद्अनुषंगीक इतर बाबी यामध्ये ग्रंथालय संचालनालय अथवा शासनाचा थेट सहभाग नाही. तसेच, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० व सुधारणा नियम २०१२ मध्ये सदर कर्मचाऱ्यांना किमान वेतन देण्याबाबत कोणतीही तरतूद नाही.

शासन निर्णय दिनांक २२ जानेवारी, १९९८ अन्वये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांसाठी आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक

अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता)(सुधारणा) नियम, २०१२ मध्ये सदर आकृतीबंधांचा समावेश करण्यात आला आहे.
(४) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदान दरात सन १९७० पासून आतापर्यंत सात वेळा वाढ करण्यात आली आहे. तसेच सन २०२२ मध्ये सन २०१२-१३ च्या अनुदान दरात ६० टक्के वाढ करण्यात आली आहे. सन २०१२-१३ च्या अनुदान दरात आणखी ४० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत विहिगाव बुद्रुक (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथील शहानुर नदीलगत पुरनियंत्रण भिंत बांधण्याबाबत

**(१४) ५६९४ (२१-११-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत विहिगाव बुद्रुक (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) यांनी ठराव क्र.७/१ नुसार पुरनियंत्रण भिंत बांधण्याचा प्रस्ताव आपत्ती व्यवस्थापन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक ०९ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास पाठविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठरावामध्ये गावालगतच्या शहानुर नदीवरील शिवमंदिर परिसरासमोरील सुमारे २०० मीटर लांबीचा कडा घसरल्यामुळे तेथील बाजुच्या घरांना धोका निर्माण झाला असून शहानुर नदीच्या काठावरील बनसोडनगर, गुरूदेव सेवामंडळ वाडी आणि हरिशचंद्र अभ्यंकर व इतरांच्या घराजवळील सुमारे ४०० मीटरचा भाग पुरस्थितीच्या वेळी धोक्याच्या पातळीमध्ये असल्याने सर्व घरे नदीच्या पाण्यात वाहून जाण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकूण ६०० मीटर लांबीची व साधारणता ३० फुट उंचीची भिंत या भागामध्ये बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन (०३-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर गावाची दिनांक २५/११/२०२५ ला प्राथमिक पाहणी सहाय्यक अभियंता श्रेणी -१ यांनी केली आहे. अंदाजे ६०० मीटर लांबीची शहाणूर नदी गावालगत असून या नदीचे पात्र या ठिकाणी चंद्रकार आकाराचे असून, त्यामुळे नदीतील पुराच्या पाण्यामुळे गावाला धोका निर्माण झाला आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात सावित्रीबाई फुले दत्तक योजना पुन्हा सुरु करण्याबाबत

**(१५) ५७०५ (२१-११-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात सावित्रीबाई फुले दत्तक योजना सुरु करण्यात आली असून या योजनेचा मुख्य उद्देश गरीब, होतकरू आणि विशेषतः अनाथ विद्यार्थिनींना शिक्षणासाठी मदत मिळावी, हा असून यासाठी शिक्षकांनी एकत्र निधी जमा करुन तो जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक आणि महाराष्ट्र बँकेत मुदत ठेव (फिक्स्ड डिपॉझिट) म्हणून ठेवला होता, या मुदत ठेवीवरील व्याजाच्या पैशांतून गरजू विद्यार्थिनींना दरमहा ३०० रुपयांची मदत देण्याची योजना आखण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनाथ आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील विद्यार्थिनींसाठी अमरावती जिल्ह्यात सुरू करण्यात आलेली 'सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना' बंद झाली असून, या योजनेंतर्गत जमा झालेला लाखोंचा निधी वापराविना बँकांमध्ये पडून असल्याने या योजनेंतर्गत जमा केलेली व्याजाची रक्कम विद्यार्थिनींपर्यंत पोहोचत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुरुवातीला या योजनेची जबाबदारी प्राथमिक शिक्षण विभागाकडे होती, मात्र कोणत्याही शिक्षक संघटनेला विश्वासात न घेता ही योजना परस्पर शिक्षण विस्तार अधिकारी यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आली, ही योजना शासनाची नसून ती पूर्णतः शिक्षकांच्या स्व-निधीवर चालणारी असल्यामुळे ती अशाप्रकारे हस्तांतरित करणे योग्य नव्हते, असे शिक्षक संघटनांचे म्हणणे असून त्यामुळे ही योजना पुन्हा सुरु करावी अशी मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना मदत करणारी 'सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना' योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१०-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

अ) ग्रामीण भागात आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेल्या मुलींना आणि शहर उपनगरातील झोपडपट्ट्यातील गरजू मुलींना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

ब) अनुसुचित जाती / जमाती, भटक्या आणि विमुक्त जातीतील मुलींना प्राधान्य देण्यात येते.

क) इयत्ता १ ली ते ८ वी मधील गरजू व होतकरु पात्र मुलींना दरमहा रुपये ३०/- प्रमाणे १० महिन्यांकरीता रुपये ३००/- या योजनेमार्फत देण्यात येतात.

(२) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात सन २०२१-२२ मध्ये एकूण १५७५ लाभार्थी मुलींना 'सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना' अंतर्गत लाभ देण्यात आला होता.सन २०२२ नंतर सदर योजनेचे हस्तांतरण योजना संचालनालय (योजना) या कार्यालयाकडे झाल्यामुळे निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींमुळे सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीत सदर योजनेचे क्रियान्वयन होऊ शकले नाही. त्यामुळे, शिक्षणाधिकारी प्राथमिक यांचे मार्फत कोणत्याही प्रकारचे अनुदान वाटप करण्यात आलेले नाही.

(३) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेच्या आर्थिक व्यवहाराचे अधिकार मा.शिक्षण सभापती व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना दिलेले आहे. सद्य:स्थितीत अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण सभापती यांचे अधिकार प्रशासक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती यांना असल्याने सदर योजना विस्तार अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली नसून, केवळ योजनेबाबतची

कार्यवाही विस्तार अधिकारी यांचेमार्फत करण्यात येत आहे.
(४) हस्तांतरण कालावधीत निर्माण झालेल्या तांत्रिक बाबींची पुर्तता करण्यात आली असून, सदर योजना नियमितपणे सुरु ठेवण्याबाबत व सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सन २०२५-२६ या वर्षाकरीता लाभार्थ्यांची यादी सर्व गटाशिक्षणाधिकारी यांच्याकडून मागविण्यात आली आहे. यामध्ये मागील वर्षातील पात्र लाभार्थ्यांनासुध्दा लाभ देण्याची प्रक्रीया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशाकरीता खाजगी क्लासेसकडून विद्यार्थ्यांच्या फसवणुक करण्यात येत असल्याबाबत

**(१६) ५७१९ (२१-११-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याकरीता खाजगी क्लासेसकडून विविध क्लृप्त्या वापरण्यात येत असून खाजगी क्लासेसकडून विद्यार्थ्यांची व शासनाची वेळप्रसंगी फसवणूक करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२१ मध्ये JEE परिक्षेमध्ये ऑल इंडिया रँक क्रमांक ११ वरील विद्यार्थी हा आपल्या इन्स्टिटयूटमध्ये शिकत असल्याचा दावा ॲलन इन्स्टिटयूटसह अन्य ५ इन्स्टिटयूटने केल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्याची दिशाभूल केल्याप्रकरणी सन २०२४ मध्ये ग्राहक संरक्षण न्यायालयाकडून ॲलन इन्स्टिटयूट या खाजगी क्लासेसला जवळपास १.४ लाख रूपयांचा दंड आकारण्यात आला, तसेच ॲलन इन्स्टिटयूटकडून शिष्यवृत्तीचे आमिष/कारण दाखवून विद्यार्थ्यांची तसेच शासनाची फसवणूक करण्यात येत असून त्यानुषंगाने विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या फी च्या रकमेपैकी काही रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात आल्याचे भासवून शासनास देय असेलेला कोट्यावधी रुपयांचा वस्तु व सेवाकर चुकवित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ॲलन इन्स्टिटयूट या खाजगी क्लास विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
शाळा,कॉलेजच्या अभ्यासक्रमांसह विविध विषयांबाबतचे खाजगी कोंचिंग क्लासेस राज्यात चालविले जात आहेत.अशा प्रकारचे क्लासेस वेगवेगळया पध्दतीने अधिकाधिक स्वत:ची आकर्षक जाहीरात करुन विद्यार्थ्यांना व पालकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत.तथापि,अशा क्लासेस मध्ये प्रवेश घेणे हे पूर्णत: विद्यार्थी/पालक यांना उत्तमोत्तम यश संपादन करण्याच्या दृष्टीने ऐच्छिक स्वरुपाचे असते.विद्यार्थ्यांची फसवणूक झाल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) अशी बाब/निवेदन आढळून आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

मे.ॲलन इन्स्टिट्यूटने सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीसाठी सदर करदात्याने रुपये ८३.४५ करोड व सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीसाठी रुपये १३१.९५ करोड अशा एकूण रुपये २१५.४ करोड एवढ्या रकमेचा जीएसटीचा भरणा केलेला जाहे. प्रस्तूत प्रकरणी मे.ॲलन करियर इन्स्टीट्यूट चे २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीची कर निर्धारणा झालेली असून कालावधी २०१८-१९ साठी रुपये १४.७५ लाख एवढ्या रकमेचा भरणा करून घेतलेला आहे. तसेच कालावधी २०१९-२० व २०२०-२१ करीता अतिरिक्त मागणी रु २.३७ करोड व त्यावरील व्याज व शास्ती रुपये २.२८ करोड अशी एकूण रुपये ४.५८ करोड इतकी नोंदविण्यात आलेली आहे. सदर अतिरिक्त मागणी ही चुकीची वजावट (ITC) घेतल्या कारणाने निश्चित करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या फी च्या रकमेपैकी काही रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात आल्याचे भासवून शासनास देय असेलेला शेकडो कोटी रूपयांचा वस्तु व सेवाकर चुकविल्याची बाब नमुद केली आहे, ही बाब कर निर्धारणी दरम्यान आढळून आली नाही. मे. ॲलन करियर इन्स्टीट्यूट यांनी विद्यार्थ्यांस फी मध्ये दिलेला डिस्काउंट हा बीजकामध्ये (Invoice) दिलेला आहे व प्रकरणी विद्यार्थ्यांना फी मध्ये दिलेला डिस्काउंट हा वस्तु व सेवाकर, २०१७ च्या कलम १५ (३) मधील तरतुदीनुसार देण्यात आलेला आहे. म्हणून मे.ॲलन करियर इन्स्टीट्यूट यांनी दिलेला डिस्काउंट हा करपात्र नाही करीता करदात्याने कर चुकविला असल्याचे सकृत दर्शनी दिसून येत नाही.

(४) व (५) खाजगी क्लासेस संदर्भात दिनांक २९/१०/२०२५ रोजी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार क्षेत्रिय कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यातील एम.फिल. पात्रताधारित प्राध्यापकांच्या नेट/सेटमधून सूट व सहयोगी प्राध्यापक पदोन्नतीसाठी देय दिनांक ग्राह्य धरण्याच्या मागणीबाबत

**(१७) ५८१० (२१-११-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्य शासनाच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्रातील ज्या प्राध्यापकांची नियुक्ती दिनांक १४ जून, २००६ किंवा त्याआधी झालेली आहे व ज्यांनी सेवेत असताना ११ जुलै, २००९ पूर्वी एम फिल पदवी पूर्ण केली आहे असे एम. फिल पात्रताधारित प्राध्यापकांना नेट/सेट मधून सूट असल्याचे अधोरेखित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सह संचालक, उच्च शिक्षक, हे सहयोगी (लेवल १३/A) प्राध्यापक या पदोन्नतीकरीता देय दिनांक न देता मुलाखतीचा दिनांक ग्राहय धरुन पदोन्नती करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे एम. फिल प्राध्यापकांचे आर्थिक नुकसान होत आहे तसेच पुढील पदोन्नतीपासून अनेक प्राध्यापक वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत माहिती व निर्णय घेउन प्राध्यापकांना करिअर ॲडव्हॉसमेट योजनेतंर्गत सहयोगी प्राध्यापक (लेवल १३/A) पदोन्नतीकरीता देय दिनांक ग्राहय धरुन सर्व लाभ मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०२-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ३१ जानेवारी, २०२४ च्या शासन पत्रान्वये एम फिल अर्हता धारण केलेल्या व ज्यांची नियुक्ती दिनांक १ जानेवारी, १९९४ ते ११ जुलै, २००९ या कालावधीत झाली आहे अशा १४२१ अध्यापकांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
शासन निर्णय दिनांक १०/०५/२०१९ नुसार अध्यापकांना कॅस (CAS) पदोन्नतीचे लाभ देण्यात येत आहेत.
(४) शासन निर्णय दिनांक १०/०५/२०१९ मधील तरतुदीनुसार लेवल १३A सहयोगी प्राध्यापक या पदावरील अध्यापकांना कॅस (CAS) पदोन्नतीचे लाभ देण्यात येत आहेत.
(५) निरंक.

---

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील भरती प्रक्रियेतील अनियमिततेबाबत

**(१८) ५८२२ (२१-११-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये भरती प्रक्रियेच्या वेळी काळ्या यादीत असलेल्या महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हार्डवेअर अ‍ॅण्ड सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी लिमिटेड, अमरावती या कंपनीशी संगनमत करून पात्र उमेदवारांना डावलून आपल्या मर्जीतल्या व्यक्तींना नोकरी देण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली व नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकांसह राज्यातील सर्व जिल्हा बँकांमध्ये भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी व पात्र, होतकरू, कष्टाळू व आभ्यासु विद्यार्थ्यांना न्याय्य संधी मिळण्याकरीता आयबीपीएस (IBPS) वा टीसीएस (TCS) सारख्या नामांकित संस्थामार्फत भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांसाठी शासनाने दिलेल्या निधीचा अनधिकृतरित्या वापर करुन कोट्यवधी रकमेचा अपहार करणाऱ्या जिल्हा बॅकैतील संचालकांवर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अपहार व गैरव्यवहारांबाबत कलम ८८ अंतर्गत चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा सहकार विभागातील सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत पत्रव्यवहार आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर सहकारी बँकेतील अपहार व गैरव्यवहारांबाबत सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा सहकार विभागातील सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच शेतकऱ्यांसाठी शासनाने दिलेल्या निधिचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर व जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये भरती प्रक्रियेच्यावेळी ब्लॅकलिस्टेड असलेल्या महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हार्डवेअर ॲण्ड सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी लिमिटेड, अमरावती या कंपनीशी संगनमत करून पात्र उमेदवारांना डावलून आपल्या मर्जीतल्या व्यक्तींना नोकरी देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे,

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सन २०१९ मध्ये नोकरभरतीची प्रक्रिया महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हार्डवेअर ॲड सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी लिमिटेड, अमरावती या एजन्सीमार्फत केली आहे. तथापि, सदर एजन्सीचे नाव काळ्या यादीत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच सन २०२५ मध्ये सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नोकरभरती प्रक्रिया राबविलेली नाही.

(२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रिया लोकहितार्थ निर्विवाद व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रिया यापुढे IBPS, TCS व MKCL यापैकी कोणत्याही एका कंपनीमार्फत ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला होता.तथापि, सदर शासन निर्णयाविरोधात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका दाखल करण्यात आली असून मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३१/१०/२०२५ रोजीचा शासन निर्णय रद्द केला आहे.

(३) नाही.

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये झालेल्या शासकीय अनुदानाच्या रकमांच्या अपहारामध्ये बँकेच्या संचालकांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) होय.

(५) शासन पत्र दिनांक १९/११/२०२५ अन्वये सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली या बँकेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ नुसार सुरु असलेली चौकशी विहित वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने "सेवानिवृत्त न्यायाधिश/ न्यायमुर्ती अथवा" सहकार विभागाच्या वरिष्ठ सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सहकार आयुक्तालयास सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांनुसार सेवानिवृत्त न्यायाधीश व सहकार विभागातील वरिष्ठ सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून संमती मागविण्यात आली आहे. तथापि, त्यांचेकडून अद्याप अनुकुल प्रतिसाद मिळालेला नाही.

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखांमध्ये शेतकरी अर्थसहाय्य व राष्ट्रीय कृषी पीक विमा भरपाई रक्कमांमध्ये अपहार केल्याप्रकरणी नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१८ शाखांमध्ये रुपये ४,००,०८,०९७/- चा अपहार झाला आहे. सदर अपहारास जबाबदार असलेल्या ११ कर्मचाऱ्यांविरुध्द बँकेने फौजदारी गुन्हे

दाखल केले असून काही कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. अपहार केलेल्या ७ कर्मचाऱ्यांना बँकेच्या सेवेतून बडतर्फ केले आहे. तसेच १२ कर्मचाऱ्यांना निलंबित करुन बँकेमार्फत त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

तसेच सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सन २०१९ मध्ये महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हार्डवेअर ॲण्ड सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी लि., अमरावती या एजन्सीमार्फत केलेल्या नोकर भरतीबाबत जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांनी चौकशी करुन दिनांक ३१/१२/२०१९ रोजी जिल्हाधिकारी, सांगली यांना
अहवाल सादर केला होता.सदर अहवालातील अभिप्राय विचारात घेतले असता, बॅकेच्या नोकर भरतीमध्ये अनियमितता आढळून आलेली नाही. सदर नोकरभरतीच्या संदर्भात शासन मान्यताप्राप्त लेखापरिक्षक यांचेकडून EDP Audit (Electronic Data Processing Audit) करुन घेऊन अहवाल सादर करण्याबाबत बँकेस दिनांक २९/०८/२०२४ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी कळविले आहे. तथापि, सदर अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली शहरालगत लिंबाळा औद्योगिक वसाहतीच्या परिसरातील वखार महामंडळाच्या गोदामातील शेकडो क्विंटल धान्याचे नुकसान झाल्याबाबत

**(१९) ५८५७ (१८-११-२०२५) श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली शहरालगत लिंबाळा औद्योगिक वसाहतीच्या परिसरात असलेल्या वखार महामंडळाच्या गोदामात शेतकऱ्यांनी साठविलेल्या शेकडो क्विंटल धान्याची महामंडळाच्या निष्काळजीपणामुळे नासाडी झाली असून याबाबत शेतकऱ्यांनी मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करण्याच्या सूचना दिल्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा अधीक्षक कृषी इत्यादींनी सदर गोदामाला भेट देऊन पाहणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पथकाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली तसेच महामंडळाच्या दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०४-१२-२०२५) :** (१) हे अशंतः खरे आहे.

८ शेतकऱ्यांचा ५१ पोती एवढा शेतमाल खराब झाला.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अपर जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तपासणी पथकाचा अहवाल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांना सादर केला आहे.

वखार नियमावलीप्रमाणे प्रक्रिया पूर्ण करून खराब झालेल्या साठ्याची लिलाव प्रकिया पूर्ण करून लिलावप्रक्रियेतून मिळालेल्या रकमेतून वखार महामंडळाचे वखार भाडे व अनुषंगीक खर्च वसूल करून उर्वरित रकमेची अदायगी संबंधित शेतकरी यांना करण्यात येणार आहे. तसेच नुकसानीच्या फरकाची रक्कम अदा करण्यात येणार आहे.

संबंधित केंद्रप्रमुख यांची दिनांक २३/०९/२०२५ रोजीच्या आदेशान्वये चिनोरा वखार केंद्र, जि.चंद्रपूर येथे बदली करण्यात आली आहे. तसेच उपरोक्त प्रकरणाची जबाबदारी निश्चित करून आर्थिक नुकसानीची वसूली संबंधित भांडारपाल यांचे वेतनातून करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील शाळांच्या वर्गखोल्यांचे पावसाळ्यात नुकसान झाल्याबाबत

**(२०) ५८६० (२६-११-२०२५) श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील १ हजार ६४ शाळांमधील वर्गखोल्यांचे नुकसान यंदाच्या पावसाळयात झाले असून जिल्हानिहाय शाळांच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्यात आले असून याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील आठही जिल्हयांतील शाळांमधील वर्गखोल्यांचे दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) पुरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक आलेले असताना पुरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती पथकास देण्यात आलेली आहे.

तसेच शाळांच्या मूलभूत सोयी-सुविधांकरीता आवश्यतेनुसार जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विभाग, सिएसआर, गौणखणिज, लोकसहभाग, जलजीवण मिशन,१४ वा/१५ वा वित्त आयोग,इ. माध्यमांतूनही निधीची तरतूद दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सुचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.